महाज्योती
ज्ञानदीप समतेचा

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**
**इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई**
**कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रध्दानंद पेठ, नागपूर - 440 022**
**दुरध्वनी क्रं.** 0712-2959381 CIN: U85300PN2019NPL187405 **ई मेल** mahajyotingp@gmail.com

**जा.क्र.** महाज्योती, नागपूर/आस्था/परिपत्रक/1537/2025-26 **दिनांक**:-16/05/2025

# -:परिपत्रक:-

**विषय:- संघ लोकसेवा आयोग- केंद्रीय सशस्त्र पोलीस दल** (Assistant Commandant) **मुख्य परीक्षा-** 2024 **उत्तीर्ण झालेल्या व्यक्तिमत्व चाचणी/मुलाखत परीक्षेसाठी अर्थ सहाय्य योजनेकरीता पात्र व अर्जांत त्रुटी असलेल्या विद्यार्थ्यांची यादी महाज्योतीच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेबाबत**.

महाज्योती, संस्थेमार्फत संघ लोकसेवा आयोग- केंद्रीय सशस्त्र पोलीस दल (Assistant Commandant) मुख्य परीक्षा 2024 उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना व्यक्तिमत्व चाचणी/मुलाखत परीक्षेकरीता आर्थिक सहाय्य प्रदान करण्यासाठी विद्यार्थ्यांकडून दि.25/04/2025 ते दि.02/05/2025 रोजी पर्यंत महाज्योतीच्या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले होते. प्राप्त झालेल्या एकूण- 62 अर्जांची तपासणी केले असता सदर व्यक्तिमत्व चाचणी/मुलाखत परीक्षेकरीता एकूण- 42 विद्यार्थी पात्र व एकूण- 20 विद्यार्थ्यांच्या अर्जांत त्रुटी आढळुन आलेली आहे.

त्यानुसार संघ लोकसेवा आयोग- केंद्रीय सशस्त्र पोलीस दल (Assistant Commandant) व्यक्तिमत्व चाचणी/मुलाखत परीक्षा 2024 अर्थसहाय्य योजनेकरीता पात्र व अर्जांत त्रुटी असलेल्या विद्यार्थ्यांची यादी महाज्योतीच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येत आहे. तसेच अर्जांत त्रुटी असलेल्या विद्यार्थ्यांना दि.18/05/2025 रोजी पर्यंत त्रुटी पुर्तता करण्यासाठी मुदतवाढ देण्यात येत आहे. याची संबंधित विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

(स्वा.)
(विकास गडपायले)
**प्रकल्प व्यवस्थापक**
महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर